# प्रेस नोट

दि. १०/०४/२०२३

| | | |
|---|---|---|
| ॲन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर गु.जि. नं.११७/२०२३, दिनांक १०/०४/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८(संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | श्री रविंद्र भाऊराव चव्हाण, वय–५७ वर्षे, व्यवसाय– नोकरी, सपोउपनि, तात्कालीन नौपाडा शहर वाहतुक शाखा, सद्या नेमणुक– ठाणेनगर वाहतुक शाखा ठाणे शहर, (वर्ग–३) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ३०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | – |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार यांचा चुलत भाऊ हा ऑटो रिक्षा भाडे तत्वावर चालविण्यास देतो. त्याचेकडील ऑटो रिक्षा कं.एम.एच.०३.बीए.५३८८ हिचे देखभाल खर्च हे तक्रारदार करत असतात. सदरची ऑटो रिक्षा तक्रारदार यांनी एका रिक्षा चालकास भाडे तत्वावर चालविण्यास दिली आहे.<br>दि.१९/०३/२०२३ रोजी तक्रारदार यांची ऑटो रिक्षा कं. एम.एच.०३.बी.ए. ५३८८ वरील चालक यांचेकडे लायसन्स व बॅच नसल्याने लोकसेवक एएसआय/चव्हाण, नौपाडा ट्रॅफिक ऑफिस यांनी सदरची रिक्षा जमा करुन घेवुन मालकाला बोलविण्यास सांगितले होते. म्हणुन तक्रारदार त्याच दिवशी लोकसेवक यांना नौपाडा ट्रॅफिक ऑफिस येथे भेटले असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे २०००/–रुपयाची मागणी केली. सदरची रक्कम घेवुन त्यांनी दि.२१/०३/२०२३ रोजी बोलाविले होते. त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेकामी त्यांनी दिनांक २१/०३/२०२३ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे तक्रार दिली.<br>दिनांक २१/०३/२०२३ रोजी नौपाडा ट्रॅफिक ऑफिस समोर करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक,''एएसआय/रविंद्र भाऊराव चव्हाण,शहर वाहातुक शाखा,नौपाडा यांनी, दि.१९/३/२०२३ रोजी तक्रारदार यांचे ऑटो रिक्षा चालक यांचेकडे लायसन्स व बॅच नाही म्हणुन ऑटो रिक्षा नौपाडा ट्रॅफिक ऑफिस येथे जमा करुन घेवुन तक्रारदार यांना बोलावुन त्यांचेकडे ३०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाचेची रक्कम लगेच स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. प्रस्तुत प्रकरणी लाचेची मागणी केली असल्याने आलोसे यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन आलोसे रविंद्र भाऊराव चव्हाण वय–५७ वर्षे, व्यवसाय– नोकरी, सपोउपनि, तात्कालीन नौपाडा शहर वाहतुक शाखा, सद्या नेमणुक– ठाणेनगर वाहतुक शाखा ठाणे शहर, (वर्ग–३) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |
| | | |

**मार्गदर्शन अधिकारी–**

**१) मा.श्री.सुनिल लोखंडे, सो.पोलीस अधीक्षक,**
**लाचलुचतप प्रतिबंध विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**२) मा. श्री अनिल घेरडीकर, सो, अप्पर पोलीस अधीक्षक**
**लाचलुचतप प्रतिबंध विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–**acbmaharashtra@mahapolice.gov.in**
३) ई–मेल आयडी :–**spacbthane@mahapolice.gov.in**
४) ॲप्लीकेशन :–**acbmaharashtra.net**
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९/९८

**(सुरेश गणपत चोपडे)**
**पोलीस निरीक्षक**
लाचलुचपत प्रतिबंधक **विभाग, ठाणे**